जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / १६ /२०१७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- १८.०२.२०१७

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-२ मधील नियम क्रं. १ अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-२ मधील नियम क्रं १ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. **महापौर, सौ. शैलजा किशोर स्वामी** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक २७.०२.२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति
श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## कार्यक्रम पत्रिका

## विषय क्रं.१

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं.अग्रीम/२०१५/प्र.क्र-५७/ विनियम नुसार कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/लेखा/ ९५०१/२०१६ दिनांक १३.१०.२०१६ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासुन सुधारीत करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रित शासकिय कर्मचा-यांना ग्रेड वेतन ४८००/- अक्षरी रुपये चार हजार आठशे फक्त पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रित राज्य शासकिय कर्मचा-यांना रु. १०,०००/- सण अग्रीम अनुज्ञेय राहील सण अग्रीम फक्त पुढील सणाना तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी घोषित करण्यात आलेल्या सणासाठी अनुज्ञेय राहिल (१) दिवाळी (२) रमजान (३) ख्रिसमस (४) पारसी नववर्ष (५) संवत्सरी (६) रोश होशनी (७) वेशाची पोर्णीमा (८) स्वातंत्र दिन (९) प्रजास्ताक दिन वरील प्रमाणे सण अग्रीम रक्कम मंजुर करण्यात यावे तरी मनपाकेतील कर्मचा-यांच्या मागणी केल्यानुसार **दिपावली सणा निमित्य प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे ५०१ कर्मचा-यांना एकूण रुपये ५०,१०,००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष दहा हजार फक्त) सण अग्रीम करुन करुन संबंधीताच्या वेतनातुन समान १० हप्त्यात कपात करुन मनपा फंडात जमा करावे सदरील सण अग्रीम देण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात येवुन सदर खर्च सालसन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात येते त्यास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.**

## विषय क्र.२

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/१२९६१/२०१६ दिनांक २९.१२.२०१६ अन्वये शासन निर्णय क्रं. घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/ सेवा-५/दिनांक १६.१२.२०१६ अन्वये राज्य शासकिय कर्मचारी व इतरांना घर भाडे भत्ता मंजुर करण्यासाठी राज्यातील शहरे / गांवे यांचे पुनवर्गीकरण शासनाने सन २०११ च्या जनगणना आधारे कैंद्रीय कर्मचा-यांना घरभाडे भत्ता मंजुरीच्या प्रयोजनासाठी कैंद्र शासनाने देशातील विविध शहरांचे / गावांचे पुनर्वर्गीकरण केलेले आहे त्या धर्तीवर राज्य शासनाने शहरे व गांवाचे वर्गीकरणे करुन सदर आदेशाच्या जोडपत्र-१ अन्वये केलेल्या सुधारीत वर्गीकरणानुसार संबंधीत शहरांना / गांवाना खालील तक्त्यात नमुद केलेल्या दरानुसार घरभाडे भत्ता शासन निर्णय निर्गमित झालेल्या तारखेपासुन मंजुर करण्याची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | शहरांचे / गावाचे वर्गीकरण | घरभाडे भत्याचे दर (मुळ वेतनाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | एक्स | ३० % |
| २ | वाय | २० % |
| ३ | झेड | १० % |

उक्त नुसार नांदेड वाघाळाशहर महानगरपालिकेचा समावेश वाय वर्ग शहरात समाविष्ट करण्यात आलेला असुन नांदेड वाघाळा शहर महापालिकेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना शासन दरानुसार घरभाडे भत्ता अदा करण्यात येत असुन सध्या घरभाडे भत्याचा दर १० टक्के अनुज्ञेय आहे.

उक्त शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना २० टक्के दराने घरभाडे भत्ता माहे डिसेंबर २०१६ पासुन लागु करण्याची प्रशासकीय व आर्थीक मंजुरी सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

यावर होणारा खर्च सालसन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षकाखालील तरतुदीतुन करण्या यावा.

## विषय क्र.३

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/१२८०८/१६ दिनांक २६.१२.२०१६ अन्वये महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.६६/सेवा-४/ दि. ०७ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर २३४% वरुन २४५% करण्यात आला असुन दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ पासुन सदर महागाई वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.६६/सेवा-४ दि. १८ ऑक्टोंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावरील महागाई वाढीच्या थकबाकीची रक्कम रोखीने अदाई करण्याचे शासन आदेश प्राप्त झाले नुसार मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. २६ दिनांक २८.०५.२००२ व्दारे दिलेल्यामान्यतेनुसार कार्योत्तर मानयतेस अधिन राहुन दिनांक १ जानेवारी १६ ते ३१ ऑगस्ट १६ या कालावधीतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावरील महागाई भत्यात वाढ २४५% दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेसाठी मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

यावर लागणारा खर्च मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

## विषय क्र.४

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/१२८०७/१६ दिनांक २६.१२.२०१६ अन्वये महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.६६/सेवा-४/ दि. ०७ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ११९% वरुन १२५% करण्यात आला असुन दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ पासुन सदर महागाई वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.६६/सेवा-४ दि. १८ ऑक्टोंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावरील महागाई वाढीच्या थकबाकीची रक्कम रोखीने अदाई करण्याचे शासन आदेश प्राप्त झाले नुसार मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. २६ दिनांक २८.०५.२००२ व्दारे दिलेल्या मान्यतेनुसार कार्योत्तर मानयतेस अधिन राहुन दिनांक १ जानेवारी १६ ते ३१ ऑगस्ट १६ या कालावधीतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावरील महागाई भत्यात वाढ १२५% दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेसाठी मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

यावर लागणारा खर्च मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

## विषय क्र.५

शासन निर्णय क्रं. मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९ दिनांक २० ऑक्टोंबर २०१६ अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना माहगाई भत्ता लागु आहे अशा वेतनधारकांना दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ पासुन वेतनश्रेणीतील मुळ वेतनावरील अधिक ग्रेड वेतन यावर १२५% दराने महागाई भत्ता वाढ मंजुर करावी व दि. ०१ जानेवारी २०१६ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीच्या अहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमीत येईल असा शासन निर्णय होता त्या अनुषंगाने महापालिकेतील कर्मचा-यांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/७७७१/२०१६ दिनांक ०८ सप्टेंबर २०१६ चे आदेशान्वये दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ पासुन १२५% महागाई भत्ता लागु करण्यात आला. शासन निर्णय क्रं. मभवा-२०१६/प्र.क्र.४४/सेवा-९/ दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ अन्वये ०१ जानेवारी २०१६ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम रोखीने देणे बाबत शासन निर्णय पारीत झाल्यानुसार मनपाकेतील कर्मचा-यांना उक्त कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम मनपाकेच्या आर्थीक परिस्थितीनुसार अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे प्रदान करण्यात आली. त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेसतव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर. यावर लागणारा खर्च अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकाखलील तरतुदीतुन करण्या यावा.

## विषय क्र.६

सन २००९ मध्ये जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मनपास ३० शहर बसेस खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निधीतुन ३० बसेस खरेदी करण्यात आल्या सदर बसेस चालविण्यासाठी योग्य असा अभिकर्ता उपलब्ध न झाल्याने मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ११० दिनांक २६.०८.२०१० नुसार मनपा व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्यात करार होवुन ३० बसेस रा.प. महामंडळाकडे हस्तांतरीत करुन दिनांक ०३.१०.२०१० पासुन शहर बस सेवा सुरु करण्यात आली.

रा.प. महामंडळाने वारंवार पत्र देवुन, तोटयाची कारणे पुढे करुन टप्या टप्याने २० शहर बसेस बंद केल्या आज रोजी केवळ १० बसेसव्दारे शहर बस वाहतुक सुरु आहे. जे की, नांदेड शहरातील व शहरालगत असलेल्या २० कि.मी. परिघातील नागरीक, विद्यार्थी, महिला व जेष्ठ नागरिक यांचेकरिता अत्यंत तोकडी व अपुरी आहे. त्यामुळे शहरात खाजगी वाहनांच्या संख्येत वाढ होवुन शहरात वारंवार वाहतकीची कोंडी होत आहे तसेच ध्वनी व वायु प्रदुषण वाढत आहे.

नांदेड शहर, उपनगरे आणि महापालिका हद्दीच्या बाहेर २० कि.मी. परिघातील जनतेकरिता उत्तम प्रकारची शहर बस सेवा उपलब्ध करुन देणें गरजेचे असुन सदर सेवा PPP (प्रायव्हेट पब्लीक पार्टनरशिप) या तत्वावर चालु करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २५ नुसार परिवहन समिती गठीत करणे.

२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे समवेत दिनांक २९.०९.२०१० रोजी करण्यात आलेला करार संपुष्ठात आणणे.

३) महानगरपालिकेतर्फे शहर बससेवा सुरु करणेसाठी रा.प. महामंडळाकडून नाहरकत प्रमाणपत्र हसतगत करणे.

४) नांदेड शहर व महानगरपालिका हद्दीच्या बाहेर २० कि.मी. परिघातील मार्ग निश्चीत करुन त्या मार्गावर शहरबस चालविण्यासाठी निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन खाजगी अभिकर्त्यास नेमणे.

५) शहर वाहतक बसेस व त्यासाठी लागणारे मनुष्यबळ हे अभिकर्त्याचे असेल आणि त्यांचे वेतन आणि लागणारा पुरक खर्च अभिकर्ता अदाई करले.

६) मार्गाची निश्चीती व शहर बस प्रवास भाडे आकारणी करण्याची पध्दत शासन निर्णयानुसार महानगरपालिका करेल.

७) अभिकर्त्याने व्यवहारीक पारदर्शकता ठेवण्यासाठी व नागरीकांना योग्य सुविधा पुरविण्यासाठी बसेसला आयटीएस, जीपीएस, इटीव्हीएम आदी संगणकिय कार्य प्रणालीचा अवलंब करावा.

८) मनपातर्फे बसेस पार्किंग, बस टर्मिनल व वाहन देखभाल करणेसाठी आगाराची जागा अभिकर्त्यास अटी व शर्तीवर उपलब्ध करुन देणे.

९) BOT (बांधा वापरा व हस्तांतरीत करा) या तत्वावर प्रवाशी निवारे उभारणे व बस थांब्यांचे फलक लावणे.

१०) BOT (बांधा वापरा व हसतांतरीत करा) तत्वावर प्रवाशी निवारे उभारल्यास त्यावरील जाहिरातीचे उत्पन्न विकासकास मिळेल.

वरील प्रमाणे व्यवस्थेतुन महानगरपालिकेस खर्च न करता शहरातील व उपनगरातील जनतेस चांगल्या प्रकारची दर्जेदार शहरबस वाहतुक सेवा उपलब्ध होईल.

करिता आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना प्राथमिक स्तरावर मुद्दा क्रं. ०१ ते १० मधील कार्यवाहीसाठी (राज्य परिवहन महामंडळ व अन्य संस्था / एजन्सी समवेत) पत्रव्यवहार व कायदेशीर कार्यवाही करण्याची अनुमती प्रदान करण्याची मान्यता प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर सदरचा ठराव याच सभेत कायम करण्याची शिफारस आहे.

## विषय क्रं.७

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण) अधिनियम १९९५ मधील कलम ४० नुसार दारिद्रय निर्मूलन योजनामधील लाभधारकांमध्ये किमान ३ % वि: समर्थ (अपंग) लाभार्थी असावेत अशी तरतुद आहे. सदर तरतुदी नुसार स्थानिक स्वराज्य संस्थानी ३ % निधी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. संकिर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवि-२० दिनांक २८.१०.२०१५ अन्वये निर्देशित केल्यानुसार जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४२०५/१६ दिनांक ०२ जुलै २०१६ अन्वये मनपा, नांदेड अंतर्गत सन २०१६-१७ साठी रुपये ४९.८३ कोटीच्या अंदाज पत्रकानुसार रुपये १,४९,००,०००/- (एक कोटी एकोनपन्नास लक्ष फक्त) निधी अपंग कल्याणकारी योजनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

त्यानुसार शासन निर्णय परिपत्रक, नगर विकास विभाग,क्र.संकीर्ण-२०१०/प्रक्र.१४६/२०१०, दिनांक ३०/१०/२०१० अन्वये अपंग व्यक्तीसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ च्या कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगासाठी राखुन ठेवायचा ३% निधी पुधील प्रयोजनार्थ खर्च करण्यात यावा.व सदरील निधी खालील योजनावर खर्च करण्यास सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

१) अपंगाच्या शालेय शिक्षण/उच्च शिक्षण/खेळांडुकरीता (जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर ) शिष्यव्रती देण्यात यावी.

२) उत्पनाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे.

३) अपंगाच्या मागणीनुसार त्यांना उदरनिर्वाह / व्यवसाय / साहित्य खरेदी करण्यासाठी निधी थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात (NEFT/RTGS व्दारे ) जमा करावा.

४) अपंगाना वैदयकिय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा.

५) नागरी वाहतुक व्यवस्थेमध्ये अपंगाकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणा-या तोटयाची भरपाई करणे.

६) शॉपिंग मॉल, मंडया, इत्यादीमध्ये अपंगाना स्टॉल उभारण्याकरीता अर्थ सहाय्य करणे.

७) महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप/डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे.

८) सार्वजनिक वाचनलयामध्ये अंध व्यक्तीकरीता ऑडीओ लायब्ररी निर्माण करणे.

९) महानगरपालिका / नगरपालीकेच्या शाळामध्ये अपंग विदयार्थ्याकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे.

१०) अपंगाच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला, इ. स्पर्धा आयोजित करणे.

११) अपंगाकरीता व्यायामशाळा उभारणे.

१२) अपंगाच्य बचत गटांना अर्थ सहाय्य करणे.

१३) अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे.

१४) अपंगाकरीता वेगळे भुवन/रात्र निवारा करणे.

१५) अपंगाना पेन्शन योजना सुरे करणे.

१६) अपंग बेरोजगारांना भत्ता देणे.

१७) अपंगाच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार/प्रसार करणे.

१८) उपरोक्त व्यक्तिरीक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे. उपरोक्त मार्गदर्शक सुचनानुसार निधीचे वाटप करतांना खालील बाबींना प्राधान्य दयावे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनलानुसार निधीचे वाटप करतांना खालील बाबींना प्राधान्य दयावे.

१) एखादया कुटुंबात एकापेक्षा जास्त अपंग व्यक्ती असल्यास त्यांना त्यांच्या उत्पन्नानुसार प्राधान्य दयावे.

२) ८० ते १०० % अपंग व्यक्ती.

३) ६० ते ८० % अपंग व्यक्ती

४) ४० ते ६० % अपंग व्यक्ती

## विषय क्र.८

मनपा हद्यीत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (NULM) अंतर्गत नागरी बेघरांसाठी निवारागृह उभारने या घटका अंतर्गत बेघर व्यक्तीसाठी निवारागृह नव्याने बांधण्यासाठी या चालु आर्थीक वर्षात भौतिक व आर्थीक उदिष्टये निर्गमीत करण्यात आलेले असुन त्यानुसार ०१ पात्र निवारा गृहाचा (DPR) सविस्तर प्रकल्प अहवाल नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर करावयाचा आहे.

त्यानुसार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खालील प्रमाणे (DPR) सविस्तर पकल्प अहवाल सादर केलेला आहे त्यामध्ये गोकूळ नगर पोलीस चौकी व हरीहरराव सोनुले कॉम्पलेक्स या दोन्ही मधील जागा असुन त्याचे सविस्तर प्रकल्प अहवालानुसार एकूण क्षेत्रफळ ३० मी. X १६ मी. एकूण ४८० चौ.मि. मध्ये बांधकाम जे की, G+1 असून एकूण ६ हॉल आहेत. १ हॉल ६.३४ x ८.३६ असे ५३ चौ.मीटर मध्ये बांधकाम जे की, G+1 असून एकूण ६ हॉल आहेत. १ हॉल ६.३४ x ८.३६ असे ५३ चौ. मीटर या मध्ये एकूण ११ बेडची व्यवस्था आहे असे ४ हॉल पुरुषांकरिता करिता तळ मजल्यावर व पहिल्या मजल्यावर २ हॉल २२ महिलांसाठी व गार्ड रुम, किचन, स्टोर केस इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदरील निवारागृहाच्या बांधकामाची प्रस्तावित किमंत ७९.९० लक्ष (एकोन्नअंशी लक्ष नव्वद हजार फक्त) होत आहे.

करिता उपरोक्त निवारागृहासाठी राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाअंतर्गत निधी प्राप्त होणार असून सदर काम करण्याकरिता व सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची मान्यता घेवुन पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

## विषय क्र.९

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिनांक २० जुलै ते ०३ ऑगस्ट २०१६ या कालावधीत **नांदेड येथे होणा-या सैन्य भरती व्यवस्थे संबंधीत दिनांक ०८ जुलै २०१६ रोजी बैठकीचे इतिवृत्तांत अन्वये महानगरपालिकेस विविध कामाचे वाटप करण्यात आले.** तसेच वाटप करण्यात आलेल्या कामाचे आढावा मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रं. २०१६/सा.शा.१/टे-१२/सैन्य भरती २०१६/सिआर-२१ दिनांक १५.०७.२०१६ अन्वये घेण्यात आला. मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र दि. १८.०७.२०१६ अन्वय सैनय भरती प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यकत्या सुविधा नियोजीत वेळेत निर्माण करुन प्रकरणी दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावे असे कळविण्यात आले होते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्पार्टस कॉम्पलेकस येथे दिनांक २० जुलै ते ०३ ऑगस्ट २०१६ या कालावधीत झालेल्या सैन्य भरती प्रक्रियेसाठी सोयीसुविधा निर्माण करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सैन्य भरतीसाठी दिनांक २० जुलै ते ०३ ऑगस्ट २०१६ या दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रिडा मैदानावर सोई सुविधांसाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसूची २०१५-१६ नुसार खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम तातडीने करुन घेण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचे रक्कम | कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १ | Water Proof Mandap, sidewall carpet, steel & wooden[ Barracketing, Video project with screen, light & sound system, sofa set, T. Poy, Water drum, table fans etc. | १६,००,७३४/- | मे. सहयोग सेवा केटरर्स अन्ड मंडप डेकोरेटर्स, नांदेड |
| २ | Temparary Toilet Block etc. | २,७६,२५०/- | मे. माझ कंस्ट्रक्शन नांदेड |

तसेच मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे दिनांक २७.०९.२०१६ च्या पत्रानुसार मा. कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी सैन्य भरतीसाठी दिनांक २० जुलै ते ०३ ऑगस्ट २०१६ दरम्यान झालेल्या सैन्य भरतीसाठी विद्यापीठाच्या क्रिडा मैदानावर दिलेल्या सोयीसुविधांचा खर्च रु. ४,८०,००९/- इतका असून मा. कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांना अदाई करणे आवश्यक आहे.

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्रं. २०१६/सा.शा.१/टे-१२/सैन्यभरती २०१६/सिआर-२१ दिनांक १८.०७.२०१६ अन्वये सैन्य भरती प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी व आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करण्या करिता रु. २,५०,०००/- निधी कार्यालयात प्राप्त झालेला आहे.

तसेच कार्यालयीन पत्रक्रं. नावाशमनपा/साबांवि/१०३९१/२०१६ दिनांक ०३ नोव्हेंबर २०१६ अनवये रुपये २३,५६,९९३/- मधुन प्राप्त निधी रु. २,५०,०००/- वजा जाता शिल्लक रुपये २१,०६,९९२/- एवढा निधी उपलब्ध करुन देणेस्तव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण नऊ (नगरपालिका निधी व अन्य निधी) मधील कलम ८९ (नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा) प्रमाणे शहराच्या बाहेर खर्च करण्याची तरतुद आहे.

करिता मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी आदेशीत केल्याप्रमाणे कामाची निकड व तातडी लक्षात घेता वर दर्शविल्याप्रमाणे कामे विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये १८,७६,९८४/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी व रुपये ४,८०,००९/- मा. कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांना अदाई करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

महापौर,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.